ISSN : 2231 4377
(Peer Reviewed Journal)

शब्दाली प्रकाशन
पुणे-५८.


SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

# सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच

वर्ष : १४ वे अंक : ५३ वा
एप्रिल-मे-जून २०२४ (अंक पहिला)

संपादक : प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन



## विज्ञानलेखक
## डॉ. संजय ढोले
## साहित्य
## विशेषांक

वितरण क्षेत्र : ❀ राज्य : पश्चिम बंगाल (कलकत्ता), उत्तर प्रदेश (वाराणसी), कर्नाटक, गोवा, गुजरात (बडोदा), तेलंगणा (हैद्राबाद) गुरुग्राम (हरियाणा)
❀ जिल्हा : पुणे, अहमदनगर, नाशिक, मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, यवतमाळ, लातूर, परभणी, जालना, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, नांदेड, जळगांव, धुळे, नंदूरबार, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम

■ एसडीएम/पुणे/एसआर/६१/६/४/२०१३ ■ आयएसएसएन : २२३१-४३७७

शब्दाली प्रकाशन पुणे-५८.

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

# सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ५३ वा
■ एप्रिल-मे-जून २०२४ (अंक पहिला)

■ संपादक :
प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन
(एम.ए., एम.फिल., पीएच.डी. - मराठी)

■ प्रकाशक, मालक, मुद्रक :
सुनिता शैलेश त्रिभुवन (एम.ए. - मराठी)
■ पत्र व्यवहारचा पत्ता : शब्दाली प्रकाशन
बी-५/२०६/दुसरा मजला, राहुलनिसर्ग, अतुलनगर, वारजे, पुणे - ४११ ०५८.
■ मो. : ९९२२१ ३०१५७
■ Email : dr.shailesh.tribhuwan@gmail.com
■ टाईपसेटिंग : गणेश ग्राफिक्स, पुणे.
■ मुद्रक : गणेश ग्राफिक्स, पुणे. मो. ९०११७७३३२२
■ मुखपृष्ठ : संपादक
■ मुद्रित शोधन : गणेश मेरगू
■ वर्गणी : वार्षिक: व्यक्ती: रु. ५००/- संस्था : रु.५००/-
त्रैवार्षिक : व्यक्ती: रु. १,२००/- संस्था : रु.१,२००/-
दहा वर्षे : व्यक्ती: रु.५,०००/- संस्था: रु.५,०००/-
■ लेख : ७०८ श्रीलिपी व ओपन फाईलमध्ये पाठवावेत.
■ वार्षिक व पंचवार्षिक वर्गणी : आपल्या स्थानिक बँकेत -
■ बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वेनगर, पुणे.
(IFCS Code - MAHB 00 00 970)
'शब्दाली प्रकाशन' पुणे. (खाते क्र. : 60058138435)
या खात्यावर जमा करून पावती शब्दाली प्रकाशनाच्या पत्त्यावर पाठवावी.
■ Google Pay & Phone Pay No.: ९९२२१ ३०१५७
(Google Pay & Phone Pay ने वर्गणी पाठवल्यास Phone Screenshot व पत्ता What'sup वर पाठवणे)

■ सल्लागार मंडळ (Adviser Committee)

| | | |
|---|---|---|
| डॉ. रावसाहेब कसबे | (नासिक) | - दूरभाष: ९८५०५४७५७८ |
| डॉ. यशवंत मनोहर | (नागपूर) | - दूरभाष: ८००७१५५५७७ |
| प्रा. दत्ता भगत | (औरंगाबाद) | - दूरभाष: ९८८१२३००८४ |
| प्रा. उत्तम कांबळे | (नासिक) | - दूरभाष: ९८८१०९९१४३ |
| प्रा. डॉ. आनंद पाटील | (कोल्हापूर) | - दूरभाष: ९४०४१४०९९५ |

■ परीक्षण समिती (Review Committee)

| | | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. संजय करंदीकर | (गुजरात) | - दूरभाष: ९९०९९१६९७८ |
| प्रा. डॉ. वंदना महाजन | (मुंबई) | - दूरभाष: ९४२१५६८३४५ |
| प्रा. डॉ. सुधाकर शेलार | (अ.नगर) | - दूरभाष: ९८९०९१३२३६ |
| प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे | (नागपूर) | - दूरभाष: ८१४९३१२१३४ |
| प्रा. डॉ. प्रभाकर देसाई | (पुणे) | - दूरभाष: ९८८११०८०२० |
| प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर | (नांदेड) | - दूरभाष: ७५८८४१२१५३ |

■ संपादक मंडळ (Editor Committee)

| | | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. सुमेध रणवीर | (प. बंगाल) | - दूरभाष: ७५८५९५०३६५ |
| प्रा. अर्चना मिरजकर | (दिल्ली) | - दूरभाष: ९८११४५४२६९ |
| प्रा. डॉ. संजय कांबळे | (कर्नाटक) | - दूरभाष: ९९६४३५८४८९ |
| प्रा. डॉ. ताहेर पठाण | (उ. प्रदेश) | - दूरभाष: ९९२२०२६६९८ |
| प्रा. डॉ. विनय मडगावकर | (गोवा) | - दूरभाष: ८३०८४७७६६४ |
| प्रा. डॉ. व्ही.एन. इंगोले | (हरियाना) | - दूरभाष: ९४२२८७१३२१ |
| प्रा. डॉ. नम्रता बागडे | (तेलंगणा) | - दूरभाष: ८८०१९६६९२० |
| प्रा. डॉ. तुषार चांदवडकर | (नासिक) | - दूरभाष: ९४२२९४३६५२ |
| प्रा. डॉ. सारिपुत्र तुपेरे | (सोलापूर) | - दूरभाष: ९८२२९८४३१३ |
| प्रा. डॉ. सुभाष आहेर | (सातारा) | - दूरभाष: ९८५०२०९३७२ |
| प्रा. डॉ. सुनिल चंदनशिवे | (कोल्हापूर) | - दूरभाष: ९८२२२०९४८९ |
| प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे | (रत्नागिरी) | - दूरभाष: ९९२१८४६१९८ |
| प्रा. डॉ. नवनाथ गोरे | (औरंगाबाद) | - दूरभाष: ९४२३१८९९५७ |


■ या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी सल्लागार मंडळ, परीक्षण समिती, संपादक मंडळ, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

■ या त्रैमासिकात लेख, शोधनिबंध, कविता छापण्यासाठी कोणतीही रक्कम स्वीकारली जात नाही. परंतु सभासदत्व अनिवार्य आहे.

■ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

■ या अंकातील लेख करारबद्ध असून इतरत्र पूर्व परवानगी शिवाय छापता येणार नाहीत. (संपादक)

■ ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी पान नंबर १२१ वर QR कोड दिलेला आहे. कृपया पहा.

# अं | त | रं | ग


| | | | |
|---|---|---|---|
| * | संपादकीय | प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन (पुणे) ........ | ०२ |
| १. | डॉ संजय ढोले यांचे उच्च साहित्यिक मूल्ये असणारे दिशादर्शक विज्ञान-साहित्य | डॉ पंडित विद्यासागर (पुणे) .................... | ०४ |
| २. | थर्ड मॅन : सशक्त विज्ञानव्यासंगाचा परिचय घडविणारा संग्रह | प्रा. डॉ फुला बागूल (शिरपूरे).................... | ०९ |
| ३. | समाजातील विसंगतीवर बोट ठेवणारा विज्ञान कथासंग्रह : खुजावा | प्रा. चिन्मय मधू घैसास (गोवा) .................. | १७ |
| ४. | डॉ. संजय ढोले : एका समर्थ विज्ञानकथा- लेखक | प्रा. डॉ. गिरीश पिंपळे (नासिक) .................. | २० |
| ५. | डॉ. संजय ढोले यांच्या विज्ञानकथेचे वेगळेपण | ज्योत्स्ना शिवाजी खंडागळे (पुणे) ............. | २१ |
| ६. | डॉ. संजय ढोले : एक विविधांगी विज्ञान कथाकार | प्रा. डॉ. रंजन गर्गे (संभाजीनगर) .............. | २६ |
| ७. | डॉ. संजय ढोले यांच्या विज्ञानकथेतील यंत्रमानव | सागर रघुनाथ सुरवसे (सोलापूर) ............... | २८ |
| ८. | डॉ. संजय ढोले : निसर्ग,मानव व विज्ञानाचे चिंतन मांडणारे कथालेखन | प्रा. डॉ. संतोष पाटील (अहिल्यापूर)........... | ३३ |
| ९. | डॉ. संजय ढोले विज्ञान साहित्यिक | स्मिता पोतनीस (कांदिवली) ...................... | ४६ |
| १०. | डॉ. संजय ढोले : एक बहुआयामी व्यक्तिमत्व | प्रा. डॉ. सुनील बिभुते (बार्शी) .................. | ५३ |
| ११. | संजय ढोले यांची विज्ञानकथा: कल्पना, वास्तव आणि संभवनीयता | प्रा. डॉ. वंदना लव्हाळे (मुक्ताईनगर) .......... | ५५ |
| १२. | विज्ञान साहित्यातील ग्रामीण प्रवाह | प्रा. डॉ. व्ही.एन. शिंदे (कोल्हापूर).............. | ५९ |
| १३. | अश्मजीव: एक आकलन | प्रा. डॉ. वसंत गावडे (पुणे) ..................... | ६६ |
| १४. | कादंबरीकार संजय ढोले. | प्रा .डॉ. माधवी खरात (पुणे) .................. | ७१ |
| १५. | प्रतिशोध - मराठी विज्ञानकथा विश्वातील डॉ. संजय ढोले यांचे योगदान | प्रा. डॉ. दया अतुल जेठे (अहमदनगर) ......... | ७३ |
| १६. | विज्ञानाविष्कार आणि शास्त्रज्ञांची जबाबदारी | सिद्धार्थ लांडे (पुणे) .......................... | ७९ |
| १७. | समाजभानी विज्ञान कथा | प्रा. डॉ. मिलिंद कसबे (नारायणगांव) .......... | ८१ |
| १८. | विज्ञानाचा ध्यास आणि सामान्य जनतेची कास धरून लिहिणारा विज्ञानकथा लेखक | प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख (नांदेड) ...... | ८४ |
| १९. | उद्याच्या अद्भुत वनस्पती विज्ञानाचा साक्षात्कार | जोसेफ तुस्कानो (मुंबई) ...................... | ८८ |
| २०. | डॉ. संजय ढोले : प्रतिभावान विज्ञान लेखक | श्रीधर लोणी (पुणे) ............................. | ९१ |
| २१. | 'प्रेमाचा रेणू'वाङ्मयीन मूल्यमापन | प्रा. डॉ. विलास दिगंबर धनवे (जळगाव) ..... | ९४ |
| २२. | पाय जमिनीवर असणारा सर्जनशील शास्त्रज्ञ, संशोधक : डॉ.संजय ढोले | प्रा. डॉ. माधव कौतिक कदम (नंदूरबार) ...... | ९९ |
| २३. | विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनातून साहित्य-लेखन करणारे एक विचारशील व विवेकशील लेखक | प्रा. डॉ. हरेश संपत शेळके (पारनेर) ............ | १०३ |
| २४. | संकरित : डॉ संजय ढोले यांच्या प्रतिभेची साक्ष देणारा कथासंग्रह | प्रा. डॉ. संस्कृती आवलगावकर (पुणे) ........ | १०५ |
| २५. | प्लॅटोन: एक वैशिष्ट्यपूर्ण विज्ञान कादंबरी | प्रा. दिलीप धोंडगे (सटाना) ..................... | १११ |
| २६. | डॉ. संजय ढोले यांचे विज्ञानसाहित्य | प्रा. डॉ. रवींद्र शिंदे (पोखरी)..................... | ११८ |
| २७. | राफिणू : विज्ञान आणि विवेकाची सांगड | किरण केंद्रे (पुणे) ................................ | १२२ |
| २८. | डॉ. संजय ढोले यांची मुलाखत | प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन (पुणे)......... | १२४ |
| २९. | परिचय | ...................................................... | १३५ |

# समाजातील विसंगतीवर बोट ठेवणारा विज्ञान कथा संग्रह : खुजाबा



प्रा. चिन्मय मधू धैसास
सहायक प्राध्यापक, मराठी अध्ययनशाखा, ताळेगांव गोवा विद्यापीठ, पिन : ४०३२०६
दूरभाष : ९८२३७२८६४०
chinmayunigoa.ac.in



कु. प्राप्ती महेंद्र गावकर
एम.ए. भाग १, मराठी अध्ययनशाखा, ताळेगांव गोवा विद्यापीठ,
पिन : ४०३२०६
दूरभाष : ७०३८१७३९०५
praptimgaonkar@gmail.com



डॉ. संजय ढोले
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
प्रथमावृत्ती २०२२.

सारांश (abstract) : मराठी साहित्याला विज्ञानसाहित्याची परंपरा आहे. क्लिष्ट वाटणारे विज्ञान साध्या, सोप्या पद्धतीने सामान्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने विज्ञानकथेची निर्मिती झाली. विसाव्या शतकात कालयंत्रापर्यंत सीमित असलेली कथा विविध संकल्पनांचा परामर्श घेऊन दाखल होऊ लागली. ह्याच कथांचे प्रतिनिधित्व डॉ. संजय ढोले ह्यांच्या कथा करतात. एकूणच विज्ञानाची विधायक आणि संहारक बाजू तितक्याच ताकदीने मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. संशोधक व संशोधनाची दुसरी भयावह बाजू त्यांच्या कथांतून ठळकपणे दिसते. 'खुजाबा' कथासंग्रहातील सर्व कथा आधुनिक शतकाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. या कथांमधून आजचा काळ प्रतीत झाल्यामुळे कथावास्तवाकडे झुकलेल्या दिसतात. विज्ञान हे सर्वसमावेशक असून वैज्ञानिक संकल्पना, प्रयोग याबरोबरच वैज्ञानिक परिणामांचीही सखोल कारणमीमांसा त्यांनी केली आहे.

प्रमुख शोधशब्द (keywords)
नॅनोब्ज, यंत्रमानव, जैवविज्ञान, प्रयोगशाळा, सूक्ष्मतरंगलहरी, तक्षणाकृती, प्रवेगक, डिंभ

प्रस्तावना : मराठी साहित्याला विज्ञानसाहित्याची परंपरा आहे. 'जे जे आपणासी ठावे ते इतरांसी सांगावे' या समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणे, क्लिष्ट वाटणारे विज्ञान साध्या-सोप्या पद्धतीने सामान्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने विज्ञानकथेची निर्मिती झाली. इतर साहित्यप्रकारांप्रमाणे विज्ञानसाहित्य हा प्रकारही पाश्चात्त्य साहित्याच्या प्रभावातून व अनुकरणातून भारतीय साहित्यात अवतरला.'सायन्स फिक्शन' ह्या इंग्रजी संज्ञेला पर्यायी संज्ञा म्हणून 'विज्ञानसाहित्य' हा शब्द अस्तित्वात आला. विज्ञानकथेची संकल्पना स्पष्ट करताना अभ्यासकांनी दिलेल्या व्याख्या लक्षात घ्याव्या लागतात. ज्या कथेतील मूळ कल्पनाच विज्ञानावर बेतलेली आहे, विज्ञानकल्पना हाच जिचा भाग आहे, अशी कथा.१ विज्ञानाचा उपयोग करून लिहिलेली अद्भुतरम्य. कथा२ ह्या व्याख्यांतून विज्ञानकथेची संकल्पना उद्धृत केलेली आहे. ह्याच संकल्पनेला केंद्रस्थानी ठेऊन विज्ञान साहित्याच्या क्षेत्रात लेखन करणारे डॉ. संजय ढोले यांनी त्यांच्या लेखनाने विज्ञानकथांचे दालन समृद्ध केले.त्यांच्या कथा सशक्त विज्ञानाच्या पार्श्वभूमीवर सक्षमपणे उभ्या आहेत. विसाव्या शतकातील विज्ञानकथेपेक्षा एकविसाव्या शतकातील विज्ञानकथा वेगळी ठरली. विसाव्या शतकात कालयंत्रापर्यंत सीमित असलेली कथा विविध संकल्पनांचा परामर्श घेऊन दाखल होऊ लागली. ह्याच कथांचे प्रतिनिधित्व डॉ. संजय ढोले यांच्या कथा करतात. डॉ. संजय ढोले हे पुणे विद्यापीठात भौतिकशास्त्र विभागात वरिष्ठ प्राध्यापक असून त्यांनी संशोधनाबरोबरच विज्ञानसाहित्याच्या क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी 'प्रतिशोध', 'प्रेमाचा रेणू', 'अश्मजीव', 'अंतराळातील मृत्यू', 'डिंभक', 'संकरित', हे विज्ञानकथासंग्रह लिहिले.'प्लँटोन' ही विज्ञान कादंबरी तर 'राफीणू' ही बालविज्ञान कादंबरी त्यांच्या नावावर आहे. अनेक मासिके तथा नियतकालिकांतून त्यांनी कथालेखन केलेले असून त्यांना अनेक पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत. डॉ. संजय ढोले यांच्या, २०२२ साली प्रकाशित झालेल्या 'खुजाबा' या कथासंग्रहातील कथांचा अभ्यास ह्या शोधनिबंधांतर्गत करून निष्कर्ष देण्यात आलेले आहेत. 'अपहरण', 'आगंतुक', 'साक्षीदार', 'खुजाबा', 'अपघात', 'कलाटणी', 'कालचक्र' अशा एकूण १२ कथा ह्या

संग्रहात आहेत. वैज्ञानिक सिद्धांतांच्या पार्श्वभूमीवर ह्या कथांची निर्मिती झाली असून मनोरंजनाबरोबरच या कथा समाजप्रबोधनही करतात. समाजातील विसंगतीवर बोट ठेवणाऱ्या व वैज्ञानिक तर्क उलगडून दाखवणाऱ्या या कथा आहेत. ह्या शोधनिबंधातून खुजाबा कथासंग्रहातील कथांची वाङ्मयीन मूल्ये व वैज्ञानिक दृष्टीकोण समजून घेऊन कथासंग्रहाचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**'खुजाबा' कथासंग्रहाचे वाङ्मयीन मूल्यमापन**

'खुजाबा' हा डॉ. संजय ढोले यांचा सातवा कथासंग्रह. 'खुजाबा' हे शीर्षकच मोठे आकर्षक आहे. कथासंग्रहाप्रमाणेच त्यातील कथांची शीर्षकेसुद्धा सूचक व आकर्षक असलेली दिसतात. 'अंधार गुणिले अंधार', 'अगम्य', 'शिखंडी' यासारखी शीर्षके सूचक व काहीशी गूढ असून कथेतील रहस्य सुचविताना दिसतात तर 'अपहरण', 'साक्षीदार', 'अपघात', 'कलाटणी', 'कालचक्र' या शीर्षकांतून कथेत घडणाऱ्या घटनांचा अंदाज येतो. 'खुजाबा' या कथासंग्रहातील शीर्षके चपखल व समर्पक आहेत. 'अंधार गुणिले अंधार' सारख्या कथांच्या शीर्षकात आलेला 'अंधार'हा विज्ञान व संशोधनाच्या क्षेत्रातील काळी, अंधारी बाजू दाखवण्याच्या हेतूने लेखक वापरतात. 'खुजाबा', शिखंडी' इ. शीर्षके नावीन्यपूर्ण आहेत.कथेच्या आशयाचा विचार केल्यास कथेच्या शीर्षकातील यथार्थता स्पष्ट होते. 'खुजाबा' कथासंग्रहातील कथांच्याआशयात वैविध्य आहे. विज्ञानाचा चांगला-वाईट परिणाम, विज्ञानामुळे वैद्यकीय सुरक्षा क्षेत्रात झालेली प्रगती असा आशय आलेला आहे. 'अपहरण', 'साक्षीदार', 'कालचक्र' यासारख्या कथांमधून गुन्हेगारांचा झालेला पडदाफाश, विज्ञान तंत्रज्ञानाचा सुरक्षा व्यवस्थापनातील उपयोग सांगणाऱ्या कथा येतात. 'आगंतुक', 'अंधार गुणिले अंधार', 'अपघात', या कथांतून विज्ञान जगतातील गुन्हेगारी वृत्तीच्या व्यक्तींचा तसेच विज्ञानाचा वापर चुकीच्या पद्धतीने केल्यास समाजावर काय अरिष्टे येऊ शकतात हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'खुजाबा', 'अपघात', 'अज्ञात जिवाणू', 'संकेत' वगैरे कथांत विज्ञान क्षेत्रातील भविष्यामधले जैवविज्ञानाशी संबंधित प्रयोग आणि तसे झाल्यास मानवजातीला असलेले संभाव्य धोके मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. विज्ञानाने केलेली संशोधने, कर्करोगासारख्या रोगावर विज्ञानाच्या जोरावर केलेली मात व वैज्ञानिक संशोधनाचा समाजाला होणारा नफा यांवर 'कालचक्र', 'कलाटणी', 'अक्षम्य', 'शिखंडी' या कथा भाष्य करतात. एकूणच विज्ञानाची विधायक आणि संहारक बाजू तितक्याच ताकदीने मांडण्याचा प्रयत्न लेखकांनी केलेला आहे. संशोधक व संशोधनाची दुसरी भयावह बाजू त्यांच्या कथांतून ठळकपणे दिसते. कथेच्या अभिव्यक्तीकडे पाहिल्यास प्रत्येक कथेची ठेवण एकसारखीच असलेली दिसते. कथा ह्या समस्याप्रधान असून त्या समस्या सोडवण्यासाठी विज्ञानाचा वापर होताना दिसतो. कथेत विज्ञान हेच नायक असून कधीकधी हेच विज्ञान खलनायकाच्या भूमिकेतही लेखकाने आणलेले दिसते. संशोधकाच्या संशोधनाशी असलेल्या नीतीमत्तेला धरूनही ह्या कथा उलगडताना दिसतात. ह्या कथांतील व्यक्तिरेखा या शास्त्रज्ञ, विज्ञान शाखेतील प्राध्यापक, तज्ज्ञ अशा आहेत. खेड्यातून आलेल्या, संशोधनाच्या क्षेत्रात भरपूर काम करून नाव कमावलेल्या, नवनवीन संशोधन करणाऱ्या, अशाच व्यक्ती कथेत येतात. यातून लेखकाला ग्राम संस्कृतीतून आलेल्या व्यक्तींबद्दल असलेली आत्मीयता दिसते. व्यक्तीची शरीरयष्टी, आत्मविश्वास, चेहऱ्यावरील तेज, बुद्धिची प्रगल्भता यांची वर्णने लेखक काही प्रमाणात करताना दिसतात मात्र कथेत व्यक्तिचित्रण किंवा पात्रांच्या स्वभावविशेषांना फार महत्त्व दिले नसून ही पात्रे कथानकातील गरजेपोटी आली असल्याचे दिसते. 'खुजाबा' संग्रहातील कथा या हेतुसाध्य असून वैज्ञानिक सत्य सांगण्याचा हेतू इथे सफल झालेला दिसतो.निसर्गावर मात करण्याची माणसाची अक्षमता आणि तसे झाल्यास पुढील काळात मानवजातीवर होणारे संभाव्य धोके याचा वेध 'खुजाबा' कथासंग्रहातील काही कथांतून डॉ. संजय ढोले घेतात. मानवी वृत्ती-प्रवृत्ती, भावभावना, माणसाला जाणवणाऱ्या आजच्या शतकातील समस्या या साऱ्याचा समावेश 'खुजाबा' कथासंग्रहातील कथांत आहे. विज्ञान आणि लालित्य ह्या दोहोंचा मेळ साधण्याचा प्रयत्न लेखकाने योग्य प्रकारे केलेला आहे. कथेचे रचनातंत्र सुरुवात, मध्य आणि अंत असेच असून कथा गतिमान व वाचनीय होण्यासाठी लेखक धक्कातंत्राचा वापर करतात. गूढता, रहस्यमयता, आणि अकल्पित कलाटणीमुळे कथेबद्दल वाचकांच्या मनात कुतुहल निर्माण होते. कथेत आलेल्या समस्येवरील साहाय्य म्हणून त्यातील वैज्ञानिक संकल्पना जरी येत असल्या तरी त्याचा कार्यकारणभाव पूर्णतः उलगडून दाखवलेला दिसतो. 'खुजाबा' कथासंग्रहातील भाषा अत्यंत साधी, अकृत्रिम वाटणारी अशी आहे. बोलण्यातील सहजता, ओघवतेपणा हे या भाषेचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. ह्या कथासंग्रहात काही ठिकाणी हिंदी तसेच इंग्रजी शब्द येतात. डॉ. संजय ढोले ह्यांनी वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट करताना कथांमध्ये अनेक

इंग्रजीमिश्रित मराठी शब्द जसे की नॅनोब्ज, न्यूरोतज्ञ यांचा वापर केलेला दिसतो. विभावांतर, तक्षणाकृती, खुजाबा अशा काही आधुनिक तंत्रज्ञान युगाशी संबंधित नवीन शब्दांचे उपायोजनही केलेले आहे.'खात्मा करणे', 'हवालदिल होणे', 'अंगावर काटा उभा राहणे' यांसारखे वाक्प्रचार तसेच 'गरज सरो वैद्य मरो' वगैरे म्हणींचा उपयोगही सहजतेने केलेला दिसतो.कथांतील संवादांची भाषा वातावरणाला पूरक अशी आहे. कथांत क्लिष्ट आणि पल्लेदार वाक्ये नसून लघु वाक्यांची रचना केली आहे. कथेची भाषा, वाक्यरचना आणि शब्दयोजना सूचक असून वाचकाच्या मनात कुतूहल जागृत करते. एकूण सर्वच कथांमधून तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर केलेला आहे. वैज्ञानिकतेला केंद्रभूत मानून जरी कथा गुंफल्या असल्या तरी कथांतीलललित्याला बाधा आलेली नाही.

**'खुजाबा' कथासंग्रहातील वैज्ञानिक कल्पना**

'अपहरण' ह्या पहिल्याच कथेत मोबाईलच्या सूक्ष्मतरंगांद्वारे तयार केलेले शोधयंत्र व पोलिसांच्या शोधकार्यात या उपकरणाचा होणारा वापर व त्याची संभाव्य नकारात्मक बाजू दाखविण्यात आली आहे. वैज्ञानिक संशोधनाची दुसरी भयानक बाजू काय व कशी असू शकते हे सांगण्याचा प्रयत्न लेखक आवर्जून करतात. 'आगंतुक'या कथेत नॅनो तंत्रज्ञान वापरून मृत मानवाला जीवंत करण्याचे,क्लोन व मुळपेशींपासून नॅनोतंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रतिरूपे निर्माण करण्याचे संशोधन आणि असे झाल्यास माणसे त्याचा कसा गैरफायदा घेतील हेच सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'साक्षीदार' कथेमध्ये मृत मानवी मेंदूतील स्मृतीचे संचय व विज्ञानाच्या आधारे त्यातील स्मृतींचा वापर करून घेतलेला गुन्हेगाराचा शोध इथे दर्शविण्यात आलेला आहे. हा विज्ञान-जगतातील एक अद्वितीय असा शोध असू शकतो. 'खुजाबा' या कथेत नॅनोब्ज म्हणजे लघुत्तम सूक्ष्म यंत्रमानवाची निर्मिती व त्यातून जैवप्रथिकांच्या उपयोजनामुळे मानवजातीस संभावणारा धोका दाखवून देताना विज्ञानापुढील समस्यांबद्दलची शंका व्यक्त केलेली आहे.'अपघात' कथेमध्ये तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जैवस्मृतिपटलांमध्ये संशोधन करून त्यांचा उपयोग करून बनवलेला स्वयंचलित यंत्रमानव व त्यात पेरलेल्या जाणिवा, यामुळे उद्भवू शकणाऱ्या समस्या यांवर भाष्य केले आहे. 'जीवाणू' कथेमध्ये परग्रहावरील जीव, जैविक विद्युत घट इ. तसेच 'अगम्य' सारख्या कथेतून किरणोत्सारी पदार्थ, न्युट्रॉन थेरपी, नाभिकीय शास्त्राच्या माध्यमातून कर्करोगावर करण्यात आलेली मात यांवर प्रकाश टाकला आहे. 'शिखंडी'कथेतून जीवाणू, किरणशास्त्रआणि जलप्रदूषण नष्ट करण्यासाठी उपयुक्त असलेल्या जीवाणूचा लागलेला शोध, किरणोत्सारी कचरा इ. वैज्ञानिक बाबी आलेल्या आहेत.'कलाटणी' या कथेमधून मूळपेशींच्या मदतीने करण्यात आलेली कर्करोगासारख्या रोगावरील उपचारपद्धती दर्शवून वैज्ञानिक विचारांना गती देण्याचे काम केले आहे.'कालचक्र' या कथेत मेंदू प्रत्यारोपणावर व त्यासाठी वापरलेल्या प्रगत प्रणालीवर भाष्य केलेले आहे. अनेक ज्ञान शाखांच्या संबंधातून गुंफलेले वैज्ञानिक संशोधनकार्य समोर ठेऊन कथा गुंफल्या गेलेल्या आहेत. नवनवीन वैज्ञानिक शोध, तंत्रज्ञान यांचे मानवी संबंधातून दिसणारे नफे तोटे यांची मांडणी कथांमधून झालेली दिसते.

**समारोप**

डॉ. संजय ढोले ह्यांच्या 'खुजाबा' कथा संग्रहातील सर्व कथा आधुनिक शतकाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अशा आहेत. या कथांमधून आजचा काळ प्रतीत झाल्यामुळे कथा वास्तवाकडे झुकलेल्या दिसतात. विज्ञान हे सर्वसमावेशक असून वैज्ञानिक संकल्पना, प्रयोग यावरोबरच वैज्ञानिक परिणामांचीही सखोल कारणमीमांसा केली आहे. त्याचसोबत मानवी नीतीमत्ता, मूल्ये, मानव-निसर्ग सहसंबंध यांवरही या कथांमधून भाष्य केलेले आहे. मानवाने प्रगत विज्ञान विकसित केले. आजही नवनवीन संशोधने होत आहेत मात्र त्याचा वापर कसा, कुठे व कोणासाठी करावा? याचा विचार करणे आवश्यक असल्याचा संदेश या कथा देतात.

**निष्कर्ष:**

१. 'खुजाबा' कथासंग्रहातील कथांतून आलेले अनुभवाचे वेगळेपण हे वैशिष्ट्यपूर्ण आहे.

२. 'खुजाबा' कथासंग्रहातूनविज्ञानाची विधायक व संहारक बाजू सारख्याच ताकदीने मांडलेली आहे.

३. 'खुजाबा' कथासंग्रहातील कथांतून प्रकट झालेले अनुभव काल्पनिक असले तरी अवास्तव वाटत नाहीत.

४. 'खुजाबा' कथासंग्रहातील कथा केवळ विज्ञान पार्श्वभूमीला घेऊन नव्हे तर विज्ञानाधिष्ठित पाया घेऊन निर्माण झालेल्या आहेत.

५. विज्ञानप्रबोधन आणि विज्ञान प्रचाराच्या हेतूने या कथा निर्माण झाल्या आहेत. ■

* संदर्भ सूची : साधन ग्रंथ : १. ढोले, संजय. खुजाबा. मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे.नोव्हेंबर, २०२२.

संदर्भ ग्रंथ: १. एरंडे, जयंत श्रीधर. मराठी विज्ञान साहित्याचा इतिहास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. प्रथमावृत्ती २०१८. पृ. क्र १६, २. तत्रैव पृ. क्र १६